# संक्षिप्त जाहिरात

## एमबीबीएस/बीएएमएस कंत्राटी अहर्ता धारक वैदयकिय अधिकारी यांची पदभरती

सिंधुदुर्ग जिल्हा सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत वैदयकिय अधिकारी रिक्तपदी दिनांक ०४/०७/२०१९ चे शासन निर्णयानुसार प्रा. आ. केंद्र स्तरावर स्थायी एम.बी.बी.एस. वैदयकिय अधिकारी मिळेपर्यंत एम.बी.बी.एस. किंवा बी. ए. एम. एस. वैदयकिय अधिकारी कंत्राटी पदधतीने तात्पुरत्या स्वरुपात भरणेकरिता व दिनांक २७/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार गट ब संवर्गातील जिल्हा परिषद आयुर्वेद दवाखाना येथील रिक्त पदी नियमित बीएएमएस वैदयकिय अधिकारी नियुक्त होईपर्यंत सदर रिक्त पदी बीएएमएस कंत्राटी वैदयकिय अधिकारी पदभरतीकरिता थेट मुलाखत दिनांक ०५/०२/२०२५ रोजी आयोजित करणेत येत असून याबाबतची सविस्तर जाहिरात सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या www.sindhudurg.nic.in या संकेत स्थळावर प्रसिदध करणेत येत आहे.

दि.

सदस्य सचिव
निवड समिती
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिष सिंधुदुर्ग

# सविस्तर जाहिरात

सिंधुदुर्ग जिल्हा सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत वैदयकिय अधिकारी रिक्तपदी दिनांक ०४/०७/२०१९ चे शासन निर्णयानुसार प्रा. आ. केंद्र स्तरावर स्थायी एम.बी.बी.एस. वैदयकिय अधिकरी मिळेपर्यंत एम.बी.बी.एस. किंवा बी. ए. एम. एस. वैदयकिय अधिकारी कंत्राटी पदधतीने तात्पुरत्या स्वरुपात भरणेकरिता व दिनांक २७/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार गट ब संवर्गातील जिल्हा परिषद आयुर्वेद दवाखाना येथील रिक्त पदी नियमित बीएएमएस वैदयकिय अधिकारी नियुक्त होईपर्यंत सदर रिक्त पदी बीएएमएस कंत्राटी वैदयकिय अधिकारी पदभरतीकरिता थेट मुलाखत मा. जिल्हाधिकारी जिल्हा सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली, दिनांक ०५/०२/२०२५ रोजी आयोजित करणेत येत आहे.

१. आवश्यक शैक्षणिक अर्हता – मान्यताप्राप्त विदयापीठाची एमबीबीएस किंवा बीएएमएस पदवी/पदव्युत्तर पदवीधारकास प्राधान्य.

२. अनभुव – शासकिय सेवेचा (नियमित किंवा कंत्राटी अनुभव असल्यास प्राधान्य).

३. वयोमर्यादा – खुला प्रवर्ग ३८ वर्षे, मागास प्रवर्ग ४३ वर्षे
सदयस्थितीत शासकिय सेवेत नियमित किंवा कंत्राटी असणाऱ्या उमेदवारांनी १ वर्षापेक्षा जास्त सेवा केली असल्यास उच्चतम वयोमर्यादेत सेवा कालावधी वाढवुन वयोमर्यादा निश्चित केली जाईल. आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक राआअ मुंबई यांचे परीपत्रक जा.क्र.राआसा/मनुष्यबळ/वयोमर्यादा/६१९४९-६२२२४/१८ दिनांक २९/०९/२०१८

४. मासिक मानधन :- रक्कम रु.४०,०००/-

५. नियुक्ती कालावधी – नियमित अथवा कंत्राटी एम. बी. बी. एस. अर्हता धारक उपलब्ध होईपर्यंत (प्रा. आ. केंद्र स्तरावर किंवा जि.प.दवाखाना नियमित वैदयकिय अधिकारी) किंवा नियुक्तीच्या दिनांकापासुन ११ महिने कालावधीकरीता यापैकी जे प्रथम घडेल त्या कालावधीकरीता नियुक्ती देणेत येईल.

६. निवड प्रक्रियेकरीता निकष :-

| अनु क्रमांक | मुल्यांकन निकष | १०० गुण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | एमबीबीएस किंवा बी.ए. एम. एस अंतिम वर्षाचे गुणांकन | ७० गुण | अंतिम वर्षाचे गुणांचे ७० गुणांमध्ये रुपांतरण |
| २ | अतिरीक्त शैक्षणिक अर्हता | १० गुण | पदव्युत्तर पदवी १० गुण |
| ३ | शासकिय निम शासकिय राष्टीय आरोग्य अभियान बीवीजी मोबाईल मेडिकल युनिट इत्यादी पैकी अनुभव | २० गुण | प्रति ६ महिने ३ गुण व एका वर्षाकरीता ६ गुण याप्रमाणे कमाल २० गुण देणेत यावेत. |

७. आवश्यक कागदपत्रांच्या प्रती –

A. एमबीबीएस किंवा बी. ए. एम. एस. अंतिम वर्षाचे गुणपत्रक
B. एमबीबीएस किंवा बी. ए. एम. एस. पदवी प्रमाणपत्रक
C. एम. सी. आय. एम. नोंदणीपत्रक व नुतनीकरण दाखला.
D. पदव्युत्तर पदवी असल्यास प्रमाणपत्र
E. जन्म तारखेचे प्रमाणपत्र

F.अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र

G. पासपोर्ट साईज फोटो २

* निवड प्रक्रिया –

अ. मुलाखतीचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. १.०० वा. पर्यंत अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी जि. प. सिंधुदुर्ग कार्यालयांत स्विकारले जातील.

आ. मुलाखतीचेच दिवशी जिल्हा परिषद सिंधुदुर्गच्या नोटीस बोर्डवर वा जिल्हा परिषदेच्या अधिक संकेतस्थळावर निवड व प्रतिक्षा यादी प्रसिदध केली जाईल.

इ. सदर निवड प्रक्रियेच्या पश्चात, तारखेमध्ये व इतर बाबींमध्ये बदल करणेचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष निवड समिती तथा जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे राहतील.

ई.सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर असून उमेदवारांस नियमित किंवा कायम शासकिय सेवाचा दावा करता येणार नाही.

उ. निवड झाल्यानंतर उमेदवारास रक्कम रु.१०० – च्या बॉण्डवर शासनाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करावे लागेल.

सदस्य सचिव
निवड समिती
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग